International Registered and Recognized Research Journal
Related to Higher Education for all subjects

ISSN : 2277-7423

Special Issue
Impact Factor : 0.4521 (UIF)

# INSIGHT

## Research Analyasis

सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बीड
व
मुर्ती व शिल्प संशोधन संस्था, औरंगाबाद
यांच्या संयुक्त विद्यमाने
दोन दिवसीय राष्ट्रीय अधिवेशन

# "Sculpture, Art and Architecture"

१० व ११ फेब्रुवारी २०२३



* आयोजक *

इतिहास विभाग
सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बीड

| | | |
|---|---|---|
| 32. | शिल्पकलेचा भारतीय वारसा : महादेव मंदिर भटाळा<br>प्रा. जयवंत एन. काकडे | 177-181 |
| 33. | औरंगाबाद लेणीतील अवलोकितेश्वर<br>सुरेश मादळे | 182-183 |
| 34. | वेरूळ लेणी महामयुरी शिल्प<br>अर्जुन पट्टेकर | 184-185 |
| 35. | मराठवाड्यातील एकमेव दुर्लक्षित खरोसा लेणी<br>प्रा. डॉ. शेख शहाजहान | 186-188 |
| 36. | चालुक्यकालीन हेमाडपंथी होट्टल मंदिर - ऐतिहासिक महत्त्व<br>डॉ. ज्योती रामराव रामोड | 189-192 |
| 37. | अजिंठ्यातील भित्तीचित्रामध्ये दडलेला निवडक जातककथांचा नाट्यपूर्ण कथाविस्तार : एक चिकित्सक अभ्यास<br>डॉ. वैशाली केशव बोदेले | 193-198 |
| 38. | वेरूळ लेणीतील हरिती व पंचिका शिल्प<br>डॉ. गणेश विधाते | 199-200 |
| 39. | दौलताबाद किल्ल्यातील जलव्यवस्थापन<br>अँनी सुमंत नल्ला, | 201-203 |
| 40. | अंधकासुर वध दशावतार लेणे, वेरूळ<br>सूर्यकांत फकिरा जाधव, प्रा.डॉ. शिरीष आंबेकर | 204-208 |
| 41. | सोलापूर किल्ल्याच्या ऐतिहासिक महत्त्व<br>प्रा. डॉ. टी. आर. पाटील | 209-213 |
| 42. | मराठवाड्यातील त्रिदल गर्भगृह असणाऱ्या चालुक्य शैलीतील मंदिराच्या सभामंडपाची विताने : एक स्थापत्यशास्त्रीय अवलोकन<br>प्रा.डॉ.प्रशांत अर्जुनराव साबळे | 214-217 |




Scanned with OKEN Scanner

# वेरूळ लेणीतील हरिती व पंचिका शिल्प

डॉ. गणेश विधाते
इतिहास विभाग,
राधाबाई काळे महिला महाविद्यालय, अहमदनगर.

प्रस्तावना:

बौद्ध मूर्तीशास्त्र हे हिंदू व जैन मूर्तीशास्त्रांएवढेच सशक्त मूर्तीशास्त्र म्हणून ओळखले जाते.[1] हिंदू मूर्तीशास्त्राप्रमाणेच बौद्ध मूर्तीशास्त्रात वेगवेगळे बुद्ध, बोधिसत्व, बोधिशक्ती, प्राणी, जातक कथांचे चित्रण मोठ्या प्रमाणात आपल्याला आढळून येतात. त्यामध्ये काही विशिष्ट असे शिल्प आपणास वैशिष्ट्यपूर्ण वाटतात. त्यामध्ये वेरूळ लेणी क्र. 9 मध्ये हरिती आणि पंचिका याचे शिल्प हे सर्व अभ्यासकांचे व पर्यटकांच्या आकर्षणाचे प्रमुख केंद्रबिंदू ठरलेले आहेत. याच शिल्पांचा शास्त्रशुद्ध अभ्यास करणे हे या शोधनिबंधाचा मुख्य उद्देश होय.

वेरूळ लेणी:

वेरूळ ही लेणी औरंगाबाद शहरापासून 30 कि.मी. अंतरावरील वेरूळ गावातील जगप्रसिद्ध लेणी आहे. सह्याद्रीच्या सातमाळा पर्वत रांगेतील डोंगरकड्यात साधारणतः 5व्या ते 7व्या शतकाच्या कालखंडात एकूण 34 लेणी यामध्ये 12 बौद्ध (1 ते 12), हिंदू लेणी 17 (13 ते 29) आणि जैन लेणी 05 (30 ते 34) लेणी आहेत. 1951 मध्ये भारत सरकारने या लेण्यांना राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित केले आणि त्यानंतर भारत सरकारच्या पुरातत्त्व विभागास सोपविण्यात आले. 1983 मध्ये युनेस्कोने आपल्या जागतिक वारसा स्थळाच्या यादीत या वेरूळ लेणीचा समावेश केला आहे.[2]

वेरूळ येथील शिल्पकलेचे व शैल्यगृहांच्या खोदण्याचे काम 5व्या शतकात सुरू झाले असले तरी 6व्या शतकाच्या मध्यार्धापर्यंत महत्त्वपूर्ण लेण्या खोदण्याचे काम केले गेले. तिन्ही धर्मांच्या लेण्याचा काळ हा जरी एकसारखा नसला तरी, काही काळ हे काम एकाचवेळी चालू असावे असे आपणास दिसून येते. बौद्ध लेण्या ह्या इ. स. 550 ते 750 असा कालखंड असावा. कारण गिरीशिल्पे खोदण्याची मूळ संकल्पनाच ही बौद्ध धर्मियांची आहे. त्यांनी आपल्या धर्माच्या प्रचारासाठी व भिक्षुंना वास्तव्य करण्यासाठी म्हणून विहार व चैत्यरूपाने या लेण्या खोदण्याची प्रथा सुरूकेली. हिंदू व जैन धर्मियांनी त्याचे अनुकरण केले. इ. स. 3-या शतकात सुरू झालेली ही गिरीशिल्पांची निर्मिती सुरवातीच्या काळात अत्यंत प्रागतिक अवस्थेत होती.[3]

वेरूळ लेणी क्र. 8:

लेणी क्र. 6, 7, 8 व 9 यापूर्वी एकाच लेणीचा भाग असावा. सर्व लेणींचे मुख्य प्रवेशद्वार असलेला भाग बहुधा काळाच्या ओघात नष्ट झालेला असावा. या सर्व लेणींचा तळमजला म्हणजे सध्याचा 7 आणि 8 क्र. लेणीचा भाग असावा.[4] लेणी क्र. 8 व लेणी क्र. 7 विहाराला लागूनच आहे. लेणीचे आकारमान मोठे असले तरी



Scanned with OKEN Scanner

त्यामानाने गर्भगृह खूपच छोटी आहेत. परंतु गर्भगृहांच्या भिंतीवर शिल्पाकृतींची रेलचेल आहे गाभा-यतील बुद्ध प्रतिमा प्रलंबपादासनात सिंहासनावर बसलेली आहे. बुद्ध प्रतिमेच्या डाव्या बाजूला चावरीधारी सेवक मैत्रेय आहे, त्याच्या डाव्या हाताला उभी स्त्री भ्रकुटी आहे.[5] पद्मपाणी अवलोकितेश्वर, सदाझरी महाविद्या, द्वारपाल मैत्रेय, बुद्धाची प्रतिमा मोठ्या प्रमाणात आपणास दिसून येतात.

हरिती व पंचिकेचे शिल्प:

लेणी क्र. 8 मध्ये काही महत्त्वपूर्ण शिल्पे आहेत. त्यामध्ये हरिती व पंचिकेचे शिल्प लक्ष वेधून घेते. ते लेणी क्र. 10 कडे जाताना वाटेवरील भिंतीवर शिल्पपट आहे. त्यामध्ये हरिती व पंचिकेच्या मूर्ती आपणास दिसून येतात. हरिती ही लहान बालकाप्रमाणे येथे चित्रित करण्यात आली आहे. कारण ती लहान बालकाची रक्षणकर्ती देवता मानली जाते. या दाम्पत्याची एक मजेशीर कथा आहे.[6]

हरिती ही यक्ष-जातीतील एक राक्षसी. ही राजगृहातील मुलांना पकडून खात असे. तिचे पंचिकाशी लग्न झाल्यावर तिला 500 मुले झाली तरी दुस-याची मुले खाण्याची तिची दुष्ट सवय गेली नाही. बुद्धांनी तिच्या लहान व आवडत्या प्रियंकर नावाच्या मुलाला आपल्या हातातील मृत्तिकापात्राने झाकून ठेवला. पुत्रवियोगाने तिच्यामधील मातृत्त्व जागे झाले व तेव्हापासून ती सर्व बालकांची संरक्षण करणारी देवता म्हणून प्रसिद्धी पावली. हिची मूर्ती प्रत्येक बुद्धसंघारामात असे. इत्सिंग या चिनी प्रवाशाने असे लिहून ठेवले आहे. समान्यपणे कडेवर एक व मांडीवर काही बालके घेतलेली हिची प्रतिमा कोरण्याचा प्रघात सर्व संघारामात होता. अजिंठा व औरंगाबाद लेणीमध्ये हरिती व पंचिकेचे शिल्प आपणास दिसून येतात.

समारोप:

वरील विवेचनावरून आपणास असे दिसून येते की, बौद्ध धम्मात अनेक मूर्ती शिल्पे मोठ्या प्रमाणात आढळून येतात. त्या प्रत्येक शिल्पामागे एक महत्त्वाचा संदेश दडलेला असतो. वेरूळ लेणीतील हरिती व पंचिकेच्या शिल्पातून वाईट प्रवृत्तीच्या संगती लागू नयेत म्हणून हे शिल्प वेगवेगळ्या स्मारकांमध्ये आपणांस दिसून येतात. बालकांचे संरक्षण व संगोपन योग्य प्रकारे व्हावे यासाठी हे शिल्प चित्रण करण्यात येत असते

संदर्भ ग्रंथसूची:

1) तिवारी मारुतीनंदन व गिरी कमल, भारतीय प्रतिमा विज्ञान, विश्वविद्यालय प्रकाशन, वाराणसी, 1998, पृष्ठ क्र. 230.
2) देगलूरकर गो. ब., वेरूळ दर्शन, स्नेहल प्रकाशन, पुणे, 2020, पृष्ठ क्र. 1.
3) टिपरे राधिका, वेरूळ लेण्यातील शिल्प वैभव, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-2018, पृष्ठ क्र. 21.
4) कित्ता, पृष्ठ क्र. 41.
5) कित्ता, पृष्ठ क्र. 42.
6) देशपांडे म. न., वेरूळ लेणी, अपरांत, पुणे-2020, पृष्ठ क्र. 29.
7) कित्ता, पृष्ठ क्र. 29

***



Scanned with OKEN Scanner